Rediffusion/Edelman

| Published Date: | 19 Sept 2017 | Publication: | Tarankit |
|---|---|---|---|
| Edition: | Pune | Page No: | 02 |

# टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ चे पुणे पर्व २६ सप्टेंबरला रंगणार

**पुणे :** टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (टीसीएस) ही माहिती तंत्रज्ञान सेवा पुरवणारी, सल्लागार आणि व्यावसायिक निराकरण करणारी कंपनी असून टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ च्या पुणे पर्वाची घोषणा आज करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतातील सर्वात मोठी प्रश्नमंजुषा असलेली ही स्पर्धा मंगळवार २६ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, शिवाजी पुतळा, कर्वे रोड, कोथरूड, पुणे येथे रंगणार आहे.

या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेशशुल्क आकारले जाणार नाही. ८ ते १२ वी पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांना (ज्युनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांसह) या प्रश्नमंजुषेत भाग घेता येणार आहे. प्रत्येक संस्थेला आठ संघ (प्रत्येक संघात दोन सदस्यांचा सहभाग) या स्पर्धेत उतरवता येणार आहेत.

टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ ही देशभरातील १२ शहरांमध्ये रंगणार आहे. अहमदाबाद, बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदूर, कोटी, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे येथे ही स्पर्धा होणार आहे.

संबंधित संस्थेमार्फत २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज पाठवता येतील. हे अर्ज सुचिता मंत्री, टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा समन्वयक, टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस, ५४-बी, हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट, हडपसर, पुणे, ४११०१३, भारत येथे पाठवावेत. अधिक माहितीसाठी ०९२२८८०८३०४ किंवा ८६९८८६७२९७ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा ऑनलाइनद्वारे www.tcsitwiz.com या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.